# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# पोलिस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा २०१७
# अंतिम निकालाची घोषणा
## जाहिरात क्र. २३/२०१७ व अधिसुचना क्र. ६६/२०१७

महाराष्ट्र लोकसेवा आयोगतर्फे पोलिस उपनिरीक्षक गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील एकूण **६५०** पदांसाठी **दि. ५ नोव्हेंबर, २०१७** रोजी घेण्यात आलेल्या **पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा - २०१७** चा अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधिन राहुन **दिनांक ८ मार्च, २०१९** रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेमध्ये **रत्नागिरी** या जिल्हयातील **श्री. खोत सुमित कल्लाप्पा,** बैठक क्रमांक **PN००५२६१,** हे राज्यातून **प्रथम** आले आहेत व **बीड** या जिल्हयातील **श्री. तिडके विष्णुपंत भगवान,** बैठक क्रमांक **PN०१४०९२** हे मागासवर्गवारीतून **प्रथम** आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून **धुळे** या जिल्हयातील **श्रीमती हिरे अश्विनी सुभाष,** बैठक क्रमांक **PN००६०५८** हया राज्यात **प्रथम** आल्या आहेत.

**२.** उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण ( cut off marks ) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**३.** सहायक कक्ष अधिकारी / विक्रीकर निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक संयुक्त (पूर्व) परीक्षेकरिता ३,३०,९०९ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून पोलिस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षेकरिता १०,०३१ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दि. ५ नोव्हेंबर, २०१७ रोजी मुंबई, औरंगाबाद, पुणे व नागपूर या जिल्हयात घेण्यात आली. लेखी परिक्षेच्या निकालाच्या आधारे शारीरिक चाचणी व मुलाखतीसाठी **२७६३** उमेदवार अर्हताप्राप्त ठरले. मुलाखती दि. ३ ऑक्टोबर, २०१८ते दि. १ डिसेंबर २०१८ या कालावधीत झाल्या.

**४.** अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार **विषयांकित गट-ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक १६ मे, २०१७ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र तसेच याच दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील.**

**५.** प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त/शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना **क्रमांक ३.८** पहावे)

**७.** T.A.No. १०/२०१८ (W.P.No.११४३९/२०१८) वरील मा. न्यायाधिकरणाच्या अंतरिम आदेशानुसार खुला खेळाडूसाठी राखीव असलेले एक पद रिक्त ठेवण्यात आले आहे.

दिनांक : ८ मार्च, २०१९
ठिकाण : मुंबई

उपसचिव (परीक्षा-१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

www.nmk.co.in